**नियमीत दिवाणी दावा नं. ६९७/२०२२ मधील नि.क्र.३० खालील आदेश**

(धिरज वि. गंगुबाई व इतर)

१. सदरचा अर्ज वादी यांनी कैफियतदाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करणेकामी दाखल केला आहे. वादीचे म्हणणे थोडक्यात असे की, वादी यांना कायदयाचे ज्ञान नसुन वादी क्र.१ सध्या शिक्षण घेत आहे व वादी क्र.२ ही विवाहीत असून सध्या दिल्या घरी नांदत आहे. वादी क्र.१ हे शिक्षणसाठी व्यस्त असल्याने उलट दाव्यातील मिळकतीबाबत कागदपत्र काढण्यास विलंब झाले आहे त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

२. याउलट प्रतिवादीने अर्जावरच म्हणणे दाखल केले आहे . प्रतिवादीने असे कथन केले आहे की, प्रतिहक्क दावा दिनांक २०.०६.२०२३ रोजी दाखल केलेला असून दाव्याकामी नक्कल वादीचे वकीलांनी स्वतः घेतलेले आहेत. त्यामुळे अर्जातील मजकुर मोघम, खोटा लिहिलेला आहे. सदर अर्जास किती दिवस उशीर झाला व कोणत्या कारणामुळे उशीर झाला निश्चित नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या कारणांचा विचार करता त्यांनी उलट दाव्यास कैफियत देण्यास उशीर केलेला आहे ही बाब मान्य करुन संयुक्तिक कारण दिले आहे. तसेच दाव्याच्या गुणदोषाचा विचार करता सदरची कैफियत समाविष्ट करुन दावा चालविणे न्यायाचे होईल. कैफियत दाखल करुन घेतलेस दाव्यातील मुळ वाद विषय पुर्णतः निकाली होण्यास मदतच होणार आहे. सबब,

अनेक वाद विषय टाळण्यासाठी आणि दावा गुणदोषावर निकाली करण्यासाठी खालील प्रमाणे आदेश पारीत.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवून कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

स्वाक्षरीत/-

**(गीता प्रविण बनकर)**

दिनांक ०५-१२-२०२३

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उमरगा

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. D. B. Nikam |
| Court | --- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Omerga |
| Date | --- | 05-12-2023 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 05-12-2023 |
| Order uploaded on | --- | 06-12-2023 |